पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

दिनांक 28/02/2020 (शुक्रवार)

(दुपार)

---

## निष्काळजीपणामुळे मृत्यू

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत मौजा प्राथमिक आरोग्य केंद्र, तितुर ता. कुही जि. नागपूर येथे प्रतिभा सदाशिव चौधरी, वय 28 वर्ष, रा. हेवती या दिनांक 18/09/2019 चे 17:00 वा. ते 17.30 दरम्यान मकरधोकडा पी.एच. सी. मध्ये उपचारासाठी भरती झाल्या. प्रतिभा चौधरी यांचे कुटुंब नियोजनाचे शस्त्रक्रिये दरम्यान त्यांचा मृत्यू झाला. अशा प्रकारचा अभिप्राय अधिष्ठाता इंदिरा गांधी मेडीकल कॉलेज नागपुर यांच्या कडुन प्राप्त झाला असुन सदर मयतास कुंटुब नियोजन करणारे आरोपी नामे– राजेश गिलानी (डॉक्टर), रा. प्राथमिक आरोग्य केन्द्र तितुर ता. कुही हे जबाबदार असल्याने कागदोपत्री पुरावा मिळाल्याने सदर डॉक्टरच्या निष्काळजीपणामुळे प्रतिभा चौधरी यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक सोनाली राठोड 7038583989 या करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावर एसबीआय एटीएम कन्हान येथे दिनांक 23/01/2020 ते दिनांक 12/02/2020 दरम्यान फिर्यादी नामे– सत्यनारायण रामचरित्र कनोजिया, वय 60 वर्ष, रा. घोरपड रोड मेंडी कामठी नागपूर हे एसबीआय कन्हानचे खातेदारक आहेत. फिर्यादी हे एसबीआय एटीएम चा वापर वेळोवेळी पैसे काढन्यासाठी करीत होते. अज्ञात आरोपीने फिर्यादीचे एटीएमचे वापर न करता व कोणत्याही प्रकारचा ओटीपी व पिन शेअर न करता फिर्यादींचे एसबीआय बॅंकेचे खत्यातुन एकुण 5,00,219/–रू. काढुन फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी विरुध्द कलम 420 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री चंद्रकान्त मदने 9922436195 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर